जा.क्र./जिजाप्रपसजळगांव/ A-4 /2020
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, जळगांव
दिनांक - 20/05/2020

**प्रति,**

**तहसिलदार (सर्व)**

**विषय :- कोवीड — 19 प्रतिबंधक उपाययोजना**
**Containment Zone मधील कुटुंबांना अर्सेनिक अल्बम — 30 या होमीओपॅथी औषधाचा मोफत पुरवठा करणेसाठी स्वयंसेवकाची नियुक्ती करणे बाबत**

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर वाढलेला असुन दिवसेंदिवस नवीन रुग्णांची त्यामध्ये भर पडत आहे. अर्सेनिक अल्बम — 30 या औषधामुळे रोग प्रतिकारक शक्ती वाढते, त्यामुळे विविध स्वयंसेवी संस्था, दानशुर व्यक्ती यांनी दिलेल्या मदतीमधुन Containment Zone मधील कुटूंबांना मोफत अर्सेनिक अल्बम — 30 या औषधांचा पुरवठा स्वयंसेवकामार्फत करण्यात येणार आहे. सदर औषधांचे वाटप करणे तसेच Containment Zone मध्ये जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे इ. कामे आपण स्वयंसेवकामार्फत यापुढील कालावधीत करणार आहोत.

**स्वयंसेवकाची निवड खालीलप्रमाणे करावी -**

1) स्वयंसेवक हा Containment Zone मधील रहिवासी असावा.
2) स्वयंसेवक हा स्वयंस्फुर्तीने काम करण्यास तयार असावा.
3) त्याचे वय सर्वसाधारणपणे 25 — 40 वर्षे या वयोगटातील असावे. त्याला कोणताही आजार नसावा
4) सर्वसाधारणपणे 50 कुटूंबासाठी एक स्वयंसेवक नेमावा.
5) कुटूंबाची यादी तयार करताना सलग घरे असलेली कुटूंब घ्यावी. या कुटूंबाशी परिचीत असलेली व्यक्तीच स्वयंसेवक घ्यावी.

**अर्सेनिक अल्बम — 30 या औषधाचे वाटपाचे नियोजन -**

1) जिल्हाधिकारी कार्यालयातुन दिनांक 20/5/2020 रोजी औषधे तहसिलदार यांना 50 — 50 डब्यांचे बंडल करुन दिले जातील.
2) तहसिलदार यांनी त्याच दिवशी सदरची औषधे Containment Zone मधील कुटूंबांची संख्या विचारात घेवुन Containment Zone Officer यांचेकडे द्यावी.
3) Containment Zone Officer यांनी प्रत्येक स्वयंसेवकास 50 बॉटल्स द्यावयाच्या आहेत आणि स्वयंसेवकाने त्या त्यांचेकडे असलेल्या 50 कुटूंबियांना वाटप करावयाच्या आहेत.
4) स्वयंसेवकांनी औषधाचे वाटप सुरु करण्यापुर्वी Sanitizer ने हात स्वच्छ धुवायचे असुन Mask घातल्याशिवाय कोणीही औषध वाटप करावयाचे नाही.

Scanned with CamScanner

5) औषधे वाटप करताना Social Distancing चे पालन होईल याची दक्षता स्वयंसेवकांनी घ्यावयाची आहे.

6) औषधाचे सेवन कसे करायचे याचे Video हे Containment Zone Officer यांचेमार्फत स्वयंसेवकांना पाठवायचे असुन स्वयंसेवकांनी ते त्यांचेकडे असलेल्या 50 कुटूंबाचे मोबाईलवर पाठवायचे आहेत. औषधाचे वाटप सुरु करण्यापुर्वीच सदरचे व्हिडीओ हे सर्व कुटुंबाना पाठविले आहेत याची खात्री Containment Zone Officer यांनी करावयाची आहे.

औषधाचे वाटप सुरळीतपणे कोणतीही गडबड न होता आणि Social Distancing चे पालक करुन होईल याची दक्षता Containment Zone Officer आणि स्वयंसेवकांनी घ्यावयाची आहे.

**स्वयंसेवकनिहाय करावयाच्या याद्या -**

| अ.क्र. | स्वयंसेवकाचे नांव | स्वयंसेवकाचा मोबाईल क्रमांक | Containment Zone मधील कुटूंब प्रमुखाचे नाव | कुटूंब प्रमुखाचा मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |

(गोरक्ष गाडीलकर)
**अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी**
**समिती, जळगाव तथा Incident Commander**

Scanned with CamScanner